ePaper

# मनोज जरांगेंना मुंबईत येण्यापासून रोखण्यास HC चा नकार; सदावर्तेंची मागणी फेटाळली!



| वर्ष - 7 | अंक - 256 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 25 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- कोहलीच्या जागी पाटीदार
- मी प्रंतप्रधान झालो तर
- ममतांचा'एकला चलो रे'चा नारा
- राम मंदिराचे स्वप्न पूर्ण केलं!


## जरांगे यांची पदयात्रा पिंपरी-चिंचवडमधून लोणावळ्याकडे रवाना

# लढेंगे और जितेंगे!

### फुलांची उधळण करत एक मराठा, लाख मराठा, एकच मिशन मराठा आरक्षण; घोषणांनी परिसर दुमदुमला





। पिंपरी ।महाईन्यूज ।

मराठा आरक्षणाचा लढा आता अंतिम टप्प्यात आला आहे. आता नाही तर कधीच नाही.. लढेंगे जितेंगे.. हम सब जरांगे आणि आरक्षण आमच्या हक्काचे..! अशा उस्फुर्त घोषणा देत सकल मराठा समाजाची पदयात्रा मुंबईकडे मार्गस्थ झाली आहे. मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वात 20 जानेवारीला अंतरवाली सराटीतून निघालेला ही पदयात्रा बुधवारी लोणावळ्यात मुक्कामी आहे. या ठिकाणी जरांगे-पाटलांची तोफ धडाडणार असून ते काय बोलणार याकडे सगळ्याचे लक्ष असणार आहे.फुलांची उधळण करत एक मराठा, लाख मराठा, एकच मिशन मराठा आरक्षण या घोषणेने परिसर दुमदुमून गेला. दुपारी बारा वाजता नियोजित असलेली पदयात्रा रात्री दहा वाजता शहरात दाखल होऊनही लोकांमधील उत्साह कायम होता. लोणावळ्याच्या दिशेने जाणाऱ्या नागरिकांना जेवण देण्यात आले. भक्ती-शक्ती येथील छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम महाराजांच्या पुतळ्याला जरांगे यांनी अभिवादन केले. चौकात मराठा बांधवांनी मोठी गर्दी केली होती. पदयात्रा जगताप डेअरी, डांगे चौक, चापेकर चौक, चिंचवड स्टेशन, खंडोबामाळ चौक, टिळक चौक भक्ती-शक्ती, देहूरोड, तळेगावदाभाडे मार्गे मध्यरात्री लोणावळ्याकडे रवाना झाली.

रात्री दहाच्या सुमारास लाखोंचा संख्येने जरांगे-पाटील यांचे शहराच्या हद्दीत पिंपळेनिलख येथील रक्षक चौकात आगमन झाले. जरांगे यांचे ठिकठिकाणी जेसीबी, क्रेनच्या सहाय्याने पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. मुस्लिम बांधवांनीही जरांगे यांचे स्वागत केले. लाखो आंदोलक त्यांच्या समवेत पदयात्रेत सहभागी झाले आहेत. जरांगे-पाटील पुणे शहरात असतानाच नागरिक पिंपरी-चिंचवड मधील पदयात्रेच्या मार्गावर दाखल झाले होते. यात्रेतील नागरिकांचे स्वागत करण्यासाठी शहरात ठिकठिकाणी मराठा बांधव, राजकीय पदाधिकाऱ्यांनी स्वागत कमानी, फलक उभारले होते.

### 130 एकराचे मैदान सज्ज

लोणावळ्यात 130 एकराचे मैदानावर जरांगे-पाटलांची ही सभा होणार आहे. यासाठी लोणावळा शहर आणि ग्रामीण भागातील सकल मराठा समाजाच्या वतीने पार्किंग, विसाव्याची व्यवस्था, जेवणाची व्यवस्था या सर्व गोष्टींचे चोख नियोजन करण्यात आले आहे.

### घराघरातून जेवणाची सोय

जरांगे-पाटलांसोबत सहभागी झालेल्या हजारो मराठा बांधवांच्या जेवणाची सोय लोणावळ्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी घराघरातून 25 चपात्या, चटणी, भाजीचा पुरवठा केला जाणार आहे.

### महिला, युवकांची संख्या लक्षणीय

» जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाला दिवसेंदिवस पाठिंबा वाढत आहे. या आंदोलनात प्रामुख्याने युवक, युवतींसह महिलांची संख्या लक्षणीय दिसून येत होती. पदयात्रेला पाठिंबा देण्यासाठी महिला, युवती रात्री उशिरापर्यंत रस्त्यावर थांबल्या होत्या. पाठिंबा दर्शविण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील मराठा बांधव दुचाकी, पायी लोणावळ्याकडे मार्गस्थ होताना दिसले.

### पोलिसांचा कडक बंदोबस्त

» मराठा आंदोलक शहरात लाखोंच्या संख्येने दाखल झाले. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. एक अतिरिक्त पोलीस आयुक्त, सहा उपायुक्त, १२ सहायक आयुक्त, ६० पोलीस निरीक्षक, १०० सहायक निरीक्षक असे एक हजार २०० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. मुंबईकडे कुच करणारा हा झंझावात बुधवारी लोणावळा शहराजवळील वाकसई चाळ या ठिकाणी मुक्काम करणार आहे.

### लोणावळ्यात जरांगे-पाटील उपसणार टीकेची तलवार!

» मराठा आरक्षणाचा लढा आता अंतिम टप्प्यात आला आहे. आता नाही तर कधीच नाही.. लढेंगे जितेंगे.. हम सब जरांगे आणि आरक्षण आमच्या हक्काचे..! अशा उस्फुर्त घोषणा देत सकल मराठा समाजाची पदयात्रा मुंबईकडे मार्गस्थ झाली आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वात 20 जानेवारीला अंतरवाली सराटीतून निघालेला ही पदयात्रा बुधवारी लोणावळ्यात मुक्कामी आहे. या ठिकाणी जरांगे-पाटलांची तोफ धडाडणार असून ते काय बोलणार याकडे सगळ्याचे लक्ष असणार आहे.

# निवडणूक लढवणं हा आपला मार्ग नाही

## » मनोज जरांगे यांच्या दिंडीच्या मार्गात करण्यात आला बदल

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी २० जानेवारीपासून जालना येथील आंतरवली सराटी येथून मोर्चाला सुरुवात केली असून शुक्रवारी (२६ जानेवारी) मुंबईतील आझाद मैदानात हा मोर्चा दाखल होणार आहे. तर पुण्यातील वाघोली येथून मनोज जरांगे पाटील यांच्या हजारोंच्या संख्येने मराठा बांधव सहभागी असलेल्या मोर्चाला आज सकाळी १० वाजण्याच्या सुमारास सुरुवात झाली आहे.**





मनोज जरांगे यांचे ठिकठिकाणी स्वागत केले जात आहे. तर यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांसोबत संवाद देखील साधला.मनोज जरांगे पाटील यांनी आगामी लोकसभा निवडणुक लढवावी आणि त्यांनी काही उमेदवार देखील उभे करावे, अशी चर्चा सुरू झाली आहे. त्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील म्हणाले की, निवडणुक लढवणं हा आपला मार्ग नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळावं, हाच आपला, माझा उद्देश आहे. राजकारण म्हटलं की, फोडाफोडीच आलीच, त्यामुळे आपलं समाजकारण सुरू ठेवायचं आणि जोपर्यंत आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत लढा सुरू ठेवायचा अशी भूमिका त्यांनी मांडली.तुमचा जालना ते मुंबई असा मोर्चाचा मार्ग असून आता पुण्यात काही मिनिटांत तुम्ही दाखल होणार आहात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होणार आहे. त्या प्रश्नावर ते म्हणाले की, शहर असो की ग्रामीण भाग, मराठा समाजातील लेकरांसाठी हा मोर्चा काढला आहे. आम्ही तुम्हाला त्रास व्हावा म्हणून चाललो नसून एक दिवसासाठी शहरातून जात आहोत, त्यामुळे तुम्ही एक तांब्या भरून पाणी दिलं पाहिजे. तसेच मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत जाऊन आमरण उपोषण करणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी ज्या कोणी नेत्यांनी विश्वासघात केला आहे. त्या नेत्यांची नावे मुंबईत गेल्यावर जाहीर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी काढलेली पदयात्रा बुधवारी शहरात दाखल झाली. पदयात्रेमुळे नगर रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. पर्यायी मार्गांवर वाहतूक कोंडी झाली. नगर रस्त्यासह, येरवडा, बंडगार्डन रस्ता, संचेती पूल, गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाल्याने वाहनचालकांना मनस्ताप सोसावा लागला. पदयात्रा बुधवारी पहाटेच्या चारच्या सुमारास नगर रस्त्यावरील खराडी-वाघोली भागात दाखल झाली. हजारो मराठा बांधव पदयात्रेत सहभागी झाले होते. पदयात्रेत सहभागी झालेले ट्रक, टेम्पो, जीप अशी वाहने घेऊन सहभागी झाले होते. पदयात्रेतील वाहनांची रांग आठ ते दहा किलोमीटरपर्यंत जाऊन पोहोचली होती. पदयात्रेत मोठ्या संख्येने वाहने सहभागी झाल्याने वाहतूक विस्कळीत झाली. त्यामुळे नगर रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला होता.नगर रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती. जरांगे यांच्या पदयात्रेचा पुणे शहरातील मार्ग नगर रस्ता, येरवडा, सादलबाबा चौक, संगमवाडी पूल, संचेती चौक, वेधशाळा चौक, गणेशखिंड रस्ता, औंध असा निश्चित करण्यात आला होता. दुपारी साडेतीनच्या सुमारास पदयात्रेतील सहभागी झालेल्या मराठा बांधवाचा पहिला जथ्था संचेती चौकात दाखल झाला. त्यानंतर या भागातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. नगर रस्त्यावरील वाहतूक सकाळी सातनंतर बंद करण्यात आली होती. त्यामुळे या भागातील शासकीय कर्मचारी, खासगी कंपनीतील कर्मचाऱ्यांनी बुधवारी सुट्टी घेतली. नगर रस्ता परिसरातील शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती. वाहनचालकांची गैरसोय होऊ नये म्हणून जुना मुंढवा पूलमार्गे वाहतूक वळविण्यात आली.

### दिंडीच्या मार्गात बदल

» मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात बीडहून मुंबईकडे निघालेली पायी दिंडी आज सकाळी पुणे शहरात पोहोचली. या दिंडीचे सगळ्या ठिकाणी अतिशय जोरदार स्वागत करण्यात आले. ठीकठिकाणी फुलांची उधळण करून मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत करण्यात आले. या यात्रेला पुण्यात अलोट गर्दी झाली आहे. यामुळे होणारी वाहतूक कोंडी आणि गैरसोयीचा विचार करता, पुणे पोलिसांनी जरांगे पाटलांना या दिंडीचा मार्ग बदलण्याची विनंती केली आहे. जरांगे यांनीही ही विनंती मान्य केल्याने दिंडीच्या मार्गात अंशत : बदल करण्यात आला आहे.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी २० जानेवारीपासून जालना येथील आंतरवली सराटी येथून मोर्चाला सुरुवात केली तर पुण्यातील वाघोली येथून मनोज जरांगे पाटील यांच्या हजारोंच्या संख्येने मराठा बांधव सहभागी असलेल्या मोर्चाला आज सकाळी १० वाजण्याच्या सुमारास सुरुवात झाली आहे.

# रोहित पवारांची ११ तासांनंतर ईडी चौकशी संपली

## » ही लढाई संपलेली नसून अशीच सुरू राहणार : रोहित पवार

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**ॲग्रो कारखान्यात झालेल्या कथित गैरव्यवहारप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहित पवार यांची आज (२४ जानेवारी) सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) तब्बल ११ तास चौकशी झाली. ११ तास ईडीला सहकार्य केल्यानंतर रोहित पवारांनी राष्ट्रवादी भवनच्या खिडकीतून उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित केलं. तसंच, त्यानंतर पत्रकारांशीही संवाद साधला. “ही लढाई संपलेली नसून अशीच सुरू राहणार असल्याचं”, ते यावेळी म्हणाले.**




ईडीकडून ११ तास चौकशी झाल्यानंतर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. त्यावेळी रोहित पवार म्हणाले, ही लढाई संपलेली नाही. ही लढाई पुढेही अशीच सुरू राहणार आहे. त्यामुळे माझ्यासाठी तब्बल १२ तास येथे जमललेल्या माझ्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचे मी मनापासून आभार मानतो.“८४ वयाच्या युवारोबर आपण एकजुटीने लढत आहोत. असे असंख्य हजोर नागरिक, कार्यकर्ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात येण्याचा प्रयत्न करत होते. पोलिसांनी अडवलं असेल. पण काही हरकत नाही. सर्व प्रेमानेच येथे येत होते. मी सहकार्य करत होतो, सहकार्य करत राहणार आहे. अधिकाऱ्यांची चूक नसते. त्यांनी जे विचारलं ते दिलं आहे. यापुढेही सहकार्य असंच राहील. तिथं जेव्हा सहकार्य करत होतो, १२ तास चौकशी चालू होती. अनेक लोक थकतात, घाबरतात, कळत नाही काय करायचं.

### पुन्हा एक तारखेला चौकशी

» पण तिथे बसलो होतो तुमच्या सर्वांचा आवाज माझ्या कानापर्यंत पोहोचत होता. माझ्या प्रेमापोटी येथे येऊन घोषणा देत होतात, लढत होतात. हे माझ्या कानावर येत होते. त्यातून मला प्रेरणा मिळत होती”, असं रोहित पवार म्हणाले.“तुम्हाला एक गोष्ट जाणवली का. जेव्हा एखादा कार्यकर्ता अडचणीत येतो, आपल्या विचारांचा आमदार अडचणीत येतो, त्याच्यावर अन्याय होतो, असं लाडक्या नेत्याला कळालं तेव्हा शरद पवार १२ तास बसले. आज ११ तासांची चौकशी झाल्यानंतर रोहित पवारांना पुन्हा १ फेब्रुवारी रोजी चौकशीकरता बोलावण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. या चौकशीकरता ईडीकडून अतिरिक्तम माहिती मागवण्यात आली आहे. ही अतिरिक्त माहिती दिली जाणार आहे, असं रोहित पवार म्हणाले. ते म्हणाले, मी आधी व्यवसायात आलो. नंतर राजकारणात आलो. जो व्यवसाय केला तो प्रामाणिकपणे केला.

## शनी मंदिर-वाकड परिसरातील नागरी आरोग्याचा प्रश्न!

# आरएमसी प्लँट'मुळे हवा, ध्वनी प्रदूषणाचा 'उच्चांक'!

### सोसायटीधारकांकडून प्रशासनाकडे तक्रार : प्लँटमुळे विद्यार्थ्यांसह रहिवाशी हैराण

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाकड, इंदिरा कॉलेज रोडवर असलेल्या 'आरएमसी प्लँट'मुळे परिसरात हवा व ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी स्थानिक सोसायटीधारकांकडून केली जात आहे.**






शनी मंदिर, इंदिरा कॉलेज रोड परिसरात रेडी मिस्क कॉँक्रिट (आरएमसी) प्लँट आहेत. या भागात मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य असते. परिसरात शाळा, कॉलेज आणि रहिवाशी क्षेत्र असल्यामुळे विद्यार्थी, नागरिकांना श्वसानाचा त्रास होत आहे. तसेच, हवा शुद्धतेवरही परिणाम होत आहे. या भागातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहने आणि आरएमसी ट्रक रहदारी करीत आहेत. या वाहनांकडून कोणत्याही वाहतूक नियमांचे पालन केले जात नाही. वेगावर नियंत्रण नसल्यामुळे अनेकदा अपघाताची परिस्थिती उद्धवली आहे. त्यामुळे पदाचारी आणि प्रवाशांमध्ये धोकादायकपणे प्रवास करावा लागतो.

विशेष म्हणजे, या भागातील बहुतेक आरएमसी प्लँट दिवसाचे २४ तास कार्यान्वयीत असतात. रात्री-अपरात्री वाहनांची वर्दळ आणि प्लँटमधील मशीनचा मोठा आवास सुरू असतो. हवा प्रदूषणासोबतच ध्वनी प्रदूषणा हा सुद्धा कळीचा मुद्दा बनला आहे. दरम्यान, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे रहिवाशांनी तक्रार नोंदवली होती. त्यावर काही अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असून, कारवाई करण्याबाबत सूचना केली आहे.

> “ शहरातील नागरीकांचे आरोग्य आणि पर्यावरण याबाबत महापालिका प्रशासनाने सतर्क असले पाहिजे. रहिवाशी क्षेत्रातील आरएमसी प्लँटमुळे स्थानिक नागरिकांना ध्वनी आणि हवा प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. वाहतूक समस्याही वाढलेली आहे. यावर प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी स्थानिक सदनिकाधारकांची मागणी आहे. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांना लेखी निवेदनही दिले आहे. या प्रश्नसंदर्भात तात्काळ कारवाई करावी, अशी आमची आग्रही मागणी आहे.
>
> – **सचिन लोंढे,** उपाध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.

#### महापालिका आयुक्तांच्या निर्णयाकडे लक्ष...

» महापालिका प्रशासनाने या गंभीर समस्येबाबत तात्काळ चौकशी करावी. नागरी आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाबाबत सकारात्मक कार्यवाही करावी. तसेच, स्थानिक नागरीक, सोसायटीधाकरांच्या हिताच्या दृष्टीने कायमस्वरुपी ठोस उपाययोजना कराव्यात आणि प्रदूषणमुक्त परिसर आणि वाहतूक कोंडीमुक्त रस्ते उपलब्ध करुन द्यावेत, अशी आग्रही मागणी रहिवाशांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना सोसायटीधारकांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन दिले आहे. त्यामुळे आयुक्त सकारात्मक प्रतिसाद दिला असून, कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

---

# मावळमध्ये विकास कामांचा धडाका!

### खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते साडे एकविस कोटींच्या कामाचे भूमिपूजन

। मावळ ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी मावळ तालुक्यात विकास कामांचा सपाटा सुरूच ठेवला आहे. अंदर मावळमधील डोंगरवाडी ते धनगर पठार अति दुर्गम भागातील नागरिकांसाठी रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन, विविध विकास कामांचे लोकार्पण खासदार बारणे यांच्या हस्ते झाले. मावळमधील अनेक गावांमध्ये स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच रस्ते झाल्याने नागरिकांनी खासदार बारणे यांचे आभार मानले.**




खासदार बारणे यांनी अंदर मावळ भागातील गावांचा दौरा करत विविध विकास कामाचे भूमिपूजन, लोकार्पण केले. तहसिलदार विक्रम देशमुख, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुका प्रमुख राजेश खांडभोर, टाटा पावरचे फुलसुंदर साहेब, मनोहर म्हात्रे, सुनिल मोरे, सरपंच छाया हेमाडे उपस्थित होते. तसेच वेहरगांव दहिवली, मळवली, वाकसई देवघर व लोणावळा शहरातील तुंर्गाली भागातील विविध विकास कामांचे भूमिपूजन केले. या वेळी माजी नगराध्यक्षा सुरेखाताई जाधव, श्रीधर पुजारी, आरपीआयचे नेते सुर्यकांत वाघमारे, दत्ता केदारी, विशाल हुलावळे, सुनिल हगवणे, सुनिल मोरे, सागर हुलावळे, वेहरगावं सरपंच वर्षाताई मावकर, पाटन सरपंच प्रवीण तिकोने मळवली सरपंच अस्लम शेख, वाकसई सरपंच मोनाली जगताप व ग्रामस्थ उपस्थित होते. सकाळी लवकर सुरू झालेला दौरा रात्री साडे नऊ वाजता दौरा संपला. रात्री उशीर हेऊनही ग्रामस्थ,गावचे सरपंच ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार बारणे यांनी सर्वाधिक निधी डोंगरभाग, आदिवासी पाडे असलेल्या मावळ तालुक्याला दिला आहे. वडेश्वर, नागाठली, कुसुवली, डाहुली, खांड कुसुर, निळसी, सावळा, इंगळून, कशाळ किवळे, भोईरे, कल्हाट, निगडे, कोडींवडे, टाकले बु.,घोनशेच कचरेवाडी येथील भूमिपूजने केली.

#### उंटावरून शेळ्या हाकत नाही..


» खासदार बारणे म्हणाले की, मावळ तालुका मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. कमी लोकवस्ती असलेली गावे आहेत. या गावांमधील अंतर्गत रस्ते पक्के नाहीत. त्यामुळे नागरिकांचे हाल होत होते. गावातील रस्ते विकास करण्यावर भर दिला. वाड्या, वस्त्यांपर्यंत रस्ते करण्यास प्राधान्य दिले आहे. सर्वाधिक निधी मावळसाठी दिला आहे. दीनदयाळ योजनेअंतर्गत दुर्गम भागातील गावांमध्ये वीज पोहोचविली आहे.दुर्गम भागात स्वातंत्र्या नंतर रस्ते लाईट केल्याचे समाधान होते.केंद्र सरकारच्या रस्ते विकास मंत्रालयाच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील कशाळे कडाव ते मावळ तालुक्यातील खांडी कुसुर मार्गे भीमाशंकर पर्यंत जाणारा मार्ग होत आहे.




# ‘मुलखावेगळ्या राजा’चे संविधान..!

**गांधीजींच्या विचारांनी प्रेरित झालेल्या एका राजाने आपल्या संस्थानात नवे संविधान लागू केले.. हा प्रयोग अविश्वसनीय आणि लक्षवेधी होता. स्वतंत्र होऊ पाहणाऱ्या भारताच्या संविधानासाठी तेव्हा मांडले जात असलेले वेगवेगळे मसुदे लिखित स्वरूपात उपलब्ध आहेत. मात्र नव्या संविधानासाठीचे प्रयत्न केवळ पुस्तकी नव्हते. काही ठिकाणी प्रत्यक्ष संविधान लागू करण्याचे प्रयोग झाले.**

ब्रिटिश काळात भारत दोन भागांत विभागला होता: ब्रिटिश भारत आणि संस्थाने. अनेक संस्थानांमध्ये राजेशाही होती. काही संस्थानांमध्ये वेगळे प्रयोग झाले. त्यापैकीच एक औंधचे. इतर संस्थानांच्या तुलनेत ते छोटे म्हणजे ७२ खेडय़ांचे होते. ही खेडी सलग नव्हती. ती सांगली, सातारा, सोलापूर आणि विजापूर जिल्ह्यात विभागलेली होती. कऱ्हाडला असलेली गादी इंग्रजांच्या ताब्यामुळे औंधला गेली. या संस्थानाचे शेवटचे राजे होते भवानराव पंतप्रतिनिधी. ते महात्मा गांधींच्या विचारांनी भारावलेले होते. स्वयंपूर्ण खेडे आणि स्वराज्य या कल्पना प्रत्यक्षात आणल्या पाहिजेत, असे त्यांचे मत होते. लोकांची सत्ता स्थापित करायची तर आपण गांधींचा सल्ला घेतला पाहिजे असा सल्ला मॉरिस फ्रीडमन यांनी त्यांना दिला. फ्रीडमन हे भवानरावांचे पुत्र आप्पासाहेब यांचे मित्र. फ्रीडमन



यांच्या सल्ल्यानुसार भवानरावांनी वर्ध्यामध्ये गांधींची भेट घेतली. स्वराज्य या विचाराविषयी चर्चा झाली. त्यानुसार १९३८ साली भवानराव पंतप्रतिनिधींनी सत्तेचा त्याग केला आणि लोकांची सत्ता स्थापन करण्याची घोषणा केली. २१ जानेवारी १९३९ रोजी त्यांनी औंध संस्थानाचे नवे संविधान लागू केले. भवानराव आधीपासूनच स्वातंत्र्य चळवळीशी जोडलेले असल्याने राजासारखे जगणे त्यांना नामंजूर होते. त्यामुळेच १९१७ पासून त्यांनी औंध संस्थानांमधील गावांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केली होती. औंधचे संविधान लागू झाल्यावर फ्रीडमन यांनी गावोगावी जाऊन लोकांसाठी कार्यालये स्थापन केली. स्वतंत्रतापूर येथे मुक्त तुरुंग स्थापन केला. आरोपींना मुक्त तुरुंगात राहून स्वसंयमाने स्वत:त बदल घडवून आणणे त्यांना अपेक्षित होते. या नव्या संविधानानुसार सर्व लोकांना मतदानाचा हक्क देण्यात आला मात्र साक्षर लोकांना मतदानाचा हक्क देण्यात यावा असे गांधींनी ‘हरिजन’मध्ये लिहिले. त्यामुळे भवानरावांनी औंध संस्थानातील निरक्षरता कमी करण्यासाठी २० हून अधिक शाळांची स्थापना केली. संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण समान व मोफत असेल, अशी तरतूद केली. पंचायत राज व्यवस्थेचा अनोखा प्रयोग या संस्थानात सुरू झाला. ग्रामस्वराज्य आणि सामाजिक एकता यांवर आधारलेले संविधान लागू झाले. संस्थानात निवडणुका झाल्या आणि आप्पा पंत हे नवे पंतप्रधान झाले. पुढे १९४३ मध्ये रामाप्पा बिद्री पंतप्रधान झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर औंध संस्थान स्वतंत्र भारतात सामील झाले. छोटे संस्थान असले तरी त्यांनी राबवलेला प्रयोग अनोखा होता म्हणूनच पं. नेहरू हा प्रयोग पाहण्यासाठी औंध संस्थानात आले होते. शिवाय ‘चले जाव’ चळवळ आणि प्रतिसरकार स्थापना यामध्ये सक्रिय असणाऱ्या क्रांतिकाऱ्यांना या संस्थानाची मदत झाली होती. इंदिरा रॉदरमंड यांनी ‘औंध एक्सपरिमेंट’ नावाचे पुस्तक लिहीत गांधीवादी संविधान तळागाळापासून लोकशाही स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. आप्पा पंतांनी तर ‘मुलुखावेगळा राजा’ असे पुस्तकच भवानराव पंतप्रतिनिधींविषयी लिहिले. भवानराव हे अनेक अर्थांनी मुलुखावेगळे होते. सर्वांना योगा, सूर्यनमस्कार करायला लावून शारीरिक आरोग्य तंदुरुस्त ठेवायला सांगणारे बहुआयामी भवानराव १९३५ साली झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षही होते. येनकेनप्रकारेण सत्ताप्राप्तीचे प्रयत्न होतानाच्या काळात, सत्तेचा त्याग करत गांधीवादी संविधान राबवण्याचा भवानरावांचा प्रयत्न आजही अविश्वसनीय वाटावा असाच, मात्र नवा मार्ग दाखवू शकेल इतका लक्षवेधी आहे!ब्रिटिश काळात भारत दोन भागांत विभागला होता: ब्रिटिश भारत आणि संस्थाने. अनेक संस्थानांमध्ये राजेशाही होती. काही संस्थानांमध्ये वेगळे प्रयोग झाले. त्यापैकीच एक औंधचे. इतर संस्थानांच्या तुलनेत ते छोटे म्हणजे ७२ खेडय़ांचे होते. ही खेडी सलग नव्हती. ती सांगली, सातारा, सोलापूर आणि विजापूर जिल्ह्यात विभागलेली होती.

## संपादकीय »

### अल्पसत्ताकांस आंदण?

***झी एन्टरटेनमेंट आणि सोनी पिक्चर्स या कंपन्यांतील विलीनीकरण बोंबलले त्या वेळी ‘झी’चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक पुनीत गोएंका हे अयोध्येत रामलल्ला विराजमान होताना पाहत होते.***

झी एन्टरटेनमेंट आणि सोनी पिक्चर्स या कंपन्यांतील विलीनीकरण बोंबलले त्या वेळी ‘झी’चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक पुनीत गोएंका हे अयोध्येत रामलल्ला विराजमान होताना पाहत होते. हा क्षण स्मृतिकोषात जतन करण्यासाठी आणि या सोहळ्याच्या कर्त्या-करवित्यांच्या स्मृतीत आपली उपस्थिती नोंदली जावी यासाठी अनेक चित्रपट तारेतारका आणि उद्योगपतींनी अयोध्येत प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास हजेरी लावली. पुनीत हे त्यातील एक. ते अयोध्येत असताना ‘सोनी’ व्यवहार फिसकटल्याची बातमी आली. भारतीय उद्योगजगताचे एक परमेश्वर मुकेश अंबानी हेही त्या वेळी अयोध्येत होते. पुनीत गोएंका यांची प्रतिक्रिया ही त्यांस उद्देशून होती किंवा काय हे ठाऊक नाही.

**भारतीय राज्यघटनेच्या, देशाच्या संविधानाच्या ७५ व्या वर्षी ‘लोकसत्ता’च्या या सदरात दर तीन आठवडय़ांनी येणारे डॉ. सिंघवी यांचे लेख संसद आणि संविधान यांच्या संबंधांविषयी असतील. हे लेख ‘इंडियन एक्स्प्रेस’मध्येही प्रकाशित होतील..**

# ‘पायाभूत चौकट’ हा लोकशाहीचा आधार!

कोणत्याही लोकशाहीत सार्वभौम सत्ता ही लोकांकडे- पर्यायाने संसदेकडे असते हे खरे; पण अशी लोकशाही अखेर बहुमताचा आधार घेते आणि बहुमत अत्याधिक असेल तर ‘सत्ता भ्रष्ट करते आणि निर्विवाद सत्ता निखालस भ्रष्ट करते’ हेही खरे ठरते. म्हणून तर, बहुमतशाहीपासून कायदेशीर संरक्षण हवे. अशी अभेद्य संरक्षक तटबंदी म्हणजे भारतीय संविधान! पण दोनतृतीयांशापेक्षा अधिक बहुमताने ही तटबंदीच मोडता आली, तर मग सांविधानिकरीत्या हुकूमशाहीची विधिवत प्रतिष्ठापना होऊ शकेल आणि उत्तर कोरिया वा चीनही स्वत:ला ‘लोकशाही प्रजासत्ताक’ म्हणवतात, तसे घडेल! तसे कदापिही नाही, हीच हमी ‘केशवानंद भारती निकाला’तून मिळते.. १३ न्यायमूर्तींच्या घटनापीठापुढे ६८ दिवस कसून युक्तिवाद (आजवरचा हा विक्रमच) झाल्यानंतर, या ७०३ पानी निकालात ११ न्यायमूर्तींच्या मतांचे प्रतिबिंब दिसते आणि ही सारी मते संविधानाच्या पायाभूत चौकटीत



बदल करता येणार नाही- लोकशाहीच्या आडून हुकूमशाही लादता येणार नाही- याची ग्वाही देतात. एखादी घटनादुरुस्ती (संविधान-‘सुधारणा’!) संसदेने सांविधानिक कार्यपद्धती पाळूनच केलेली असली तरीही संविधानाच्या पायाभूत संकल्पनात्मक चौकटीशी विपरीत दुरुस्ती रद्द ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे, हा दंडक या निकालाने घालून दिला. संविधानाची पायमल्ली करण्याचा वा जुलूमशाहीला अधिकृतता देण्याचा कोणताही प्रयत्न ‘मूलभूत चौकटी’च्या या सिद्धान्तामुळेच अपयशी ठरत राहील.. मग संसदेतले बहुमत १०० टक्के का असेना! ही मूलभूत चौकट म्हणजे काय हे ठरवण्याचा अधिकार संविधानाचे संरक्षक या नात्याने वरिष्ठ न्यायालयांकडेच आहे आणि गेल्या ५० वर्षांत त्यांनी तो उत्तमरीत्या वापरलाही आहे, त्यामुळेच : एक व्यक्ती एक मत, धर्मनिरपेक्षता, संघराज्यवाद आणि संघराज्यीय व्यवस्था, प्रजासत्ताकवाद, न्यायपालिकेची स्वायत्तता आणि न्यायिक पुनर्विलोकनाचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार आदी संकल्पना या संविधानाच्या पायाभूत चौकटीचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट झालेले आहे. ‘न्यायाधीश तर निवडून आलेले नसतात, लोकशाहीत सत्ता लोकांच्याच हाती असायला हवी ना.. मग ही लोकशाहीची पायमल्ली नाही का?’ वगैरे कितीही युक्तिवाद होत राहिले तरीही लोकशाहीचे भारतीय स्वरूप टिकून राहण्यासाठी असा कायमस्वरूपी दंडकच शक्तिशाली ठरला आहे, ठरतो आहे, राहील! संविधान पालटून टाकता येते का, या मुद्द्यावरला पहिला – १९५१ मधला ‘शंकरीप्रसाद निकाल’ मात्र संसदेच्या बाजूने लागला होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मोदींनी बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण केलं!

## मुख्यमंत्री शिंदेंनी हाती घेतले फावडे अन् ट्रॅक्टरही चालवला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री पदासाठी बाळासाहेबांचे आणि शिवसेनेचे विचार सोडणाऱ्या, सत्तेसाठी काँग्रेसचे तळवे चाटणाऱ्या उद्धव ठाकरेंना मिंधेपणा बद्दल बोलण्याचा अधिकार नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दरे (ता महाबळेश्वर) येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले आम्ही बाळासाहेबांचे विचार सोडलेले नाहीत.**



त्यांनी माझ्यावर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. माझ्यावर टीका केली हे ठीक आहे. पण पंतप्रधान मोदींवर टीका करण्याचा तुम्हाला अधिकारच नाही. कारण त्यांनी बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण केलं आहे. काश्मीरच ३७० कलम रद्द केलं. राम मंदिराचे स्वप्न पूर्ण केलं. करोडो भारतीयांप्रमाणे बाळासाहेब ठाकरेंचंही राम मंदिराचे स्वप्न होतं. ते पंतप्रधान मोदींनी पूर्ण केलं. उलट उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान मोदींना साष्टांग दंडवत घालायला हवे होते.ज्या बाळासाहेबांनी काँग्रेसला दूर ठेवले. जर मी काँग्रेसच्या जवळ गेलो तर माझी शिवसेना सुद्धा काँग्रेस सारखी होईल. त्यावेळी मी शिवसेना बंद करेन असे बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते. त्यांनी बाळासाहेबांचे विचार सोडले, स्वार्थासाठी सगळे सोडलं. जनतेने भाजपा सेना म्हणून निवडून दिलेले होते. मात्र यांनी मित्र पक्षाच्या पाठीतही खंजीर खुपसला मग गद्दारी कोणी केली म्हणजे मिंध्येपणा कोणी केला .परंतु हल्ली त्यांची वागण्याची आणि विचार करण्याची पद्धत बदलली आहे. लांडग्यानी वाघाचं कातडं पांघरलं म्हणून लांडगा वाघ होत नाही. कोणी बाळासाहेबांसारखे कपडे घातले म्हणून बाळासाहेब होता येत नाही. बाळासाहेब व्हायला वाघाचं काळीज असावं लागतं असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे  दरे येथे म्हणाले. त्यांनी विरोधकांवर सडकून टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. त्यांनी अनेक योजनांना मार्गी लावल्या. अनेक योजनांची भूमिपूजन हे आम्ही त्यांच्याकडून केली आणि उद्घाटनही त्यांच्याकडूनच करत आहोत ,असं कधी झालं आहे का. पण आम्ही करतो आहोत. केंद्र सरकारचा महाराष्ट्राला खूप मोठे पाठबळ मिळत आहे. त्यांनी मात्र करोना काळापासून अनेक कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार केला आहे. थोडं थांबा सगळेच बाहेर येईल.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या त्यांच्या मूळ गावी गेले आहेत. महाबळेश्वर येथील दरे हे त्यांचं मूळ गाव. विविध कारणांसाठी ते गावच्या दौऱ्यावर सतत जात असतात. तसंच, गावी गेले की ते हमखास शेतीत रमतात. आताही ते गावातील यात्रेनिमित्त दरे येथे गेले आहेत. तिथे त्यांनी पुन्हा शेतीकामे केली.

यासंदर्भातील माहिती देताना त्यांनी सुप्रिसद्ध कवियत्री शांता शेळके यांची कविताही शेअर केली आहे."हे एक झाड आहे याचे माझे नाते.. वाऱ्याची एक झुळूक दोघांवरूनी जाते.. मला आवडतो याच्या फुलांचा वास.. वासामधुनी उमटणारे जाणीव ओले भास..", अशी कविता एकनाथ शिंदे यांनी एक्स या समाजमाध्यमावर पोस्ट केली आहे.तसंच, ते पुढे म्हणाले, सुप्रसिद्ध मराठी कवयित्री शांता शेळके यांच्या ओळी माझ्या गावाच्या मातीत रमल्यावर माझ्या ओठी येतात, कारण गावातील मातीचा सुगंध मला शेतीकडे आणि माझ्या जन्मभूमीकडे खेचून आणतो. जेव्हा मी माझ्या गावी येतो तेव्हा तेव्हा माझे पाय आपोआप शेतीकडे वळतात. महाबळेश्वर तालुक्यातील दरे गावात यात्रेनिमित्त आलो असता पुन्हा एकदा शेती आणि मातीत रमलो. यावेळी शेतीकाम करून एक अलौकिक आनंद मिळाला."माझ्या दरे या गावी औषधी हळद, स्ट्रॉबेरी, आंबे, काजू, चिकू, बटाटा, सफरचंद, अव्हॅकॅडो, अगरवूड अशी विविध प्रकारची फळझाडे आणि भाजीपाला यांची लागवड मी केली आहे.

### विकासासाठी खूप मोठे योगदान

अशीही माहिती त्यांनी यावेळी दिली."शेतीत रमताना एक वेगळा आनंद मिळतो. थोड्या वेळासाठी का होईना पण अन्य सर्व बाबी बाजूला राहतात. गावाकडची माणसं यांच्याशी असलेले नाते याचे आयुष्यात एक वेगळे महत्त्व असते. त्यामुळेच या ठिकाणी येऊन शेती केल्यावर एक वेगळाच आनंद मिळत असल्याचे मत यावेळी व्यक्त केले.ज्या बाळासाहेबांनी काँग्रेसला दूर ठेवले. जर मी काँग्रेसच्या जवळ गेलो तर माझी शिवसेना सुद्धा काँग्रेस सारखी होईल. त्यावेळी मी शिवसेना बंद करेन असे बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते. त्यांनी बाळासाहेबांचे विचार सोडले, स्वार्थासाठी सगळे सोडलं. जनतेने भाजपा सेना म्हणून निवडून दिलेले होते. मात्र यांनी मित्र पक्षाच्या पाठीतही खंजीर खुपसला मग गद्दारी कोणी केली म्हणजे मिंध्येपणा कोणी केला .परंतु हल्ली त्यांची वागण्याची आणि विचार करण्याची पद्धत बदलली आहे. लांडग्यानी वाघाचं कातडं पांघरलं म्हणून लांडगा वाघ होत नाही.बाळासाहेब व्हायला वाघाचं काळीज असावं लागतं असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दरे येथे म्हणाले.त्यांनी विरोधकांवर सडकून टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. त्यांनी अनेक योजनांना मार्गी लावल्या.

# आरोग्य विभागाकडून अर्थसंकल्पात १६,१३३ कोटींची मागणी!

## अर्थसंकल्पाच्या 8 टक्के निधी आरोग्याला हवा : आरोग्य विभाग

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**करोनामुळे आरोग्याच्या विस्ताराच्या गरजा अधोरेखित केल्या असून सार्वजनिक आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी अर्थसंकल्पात मोठी तरतूद करण्याची भूमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अलीकडेच मांडली होती. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने अर्थसंकल्पात आरोग्यासाठी १६,१३३ कोटी रुपये मिळावे अशी मागणी अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.**

आरोग्याच्या विविध योजनांची अंमलबजाणी करण्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पाच्या किमान आठ टक्के रक्कम आरोग्य विभागाला मिळाली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी घेतली आहे.राज्याचा अर्थसंकल्प फेब्रुवारी महिन्यात मांडण्यात येत असून यासाठी प्रत्येक विभागाकडून अर्थसंकल्पात आपल्याला किती निधी मिळावा याची मागणी अर्थमंत्र्यांकडे सादर केली जाते. आरोग्य विभागाने तयार केलेल्या अर्थसंकल्पीय मागणीत विविध योजनांसाठी मिळून २०२४-२५ साठी १६,१३३ कोटी रुपयांची मागणी केली आहे. गेल्या वर्षी आरोग्य विभागाने ६,०२३ कोटी रुपयांची मागणी केली होती. मात्र तत्कालीन




अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोग्य विभागाला अर्थसंकल्पात ३,५०१ कोटी रुपये मंजूर केले होते. आरोग्य विभागाकडून मागील अनेक वर्षे जेवढा निधी मागितला जातो त्यापैकी सत्तर टक्केच निधी अर्थ विभागाकडून देण्यात येत असल्यामुळे आरोग्य विभागाच्या अनेक योजना एक तर रखडतात तरी किंवा त्याची अंमलबजावणीच करता येत नसल्याचे आरोग्य विभागाच्या डॉक्टरांचे म्हणणे आहे. प्रामुख्याने लोकप्रतिनिधींकडून नवीन रुग्णालये उभारणे, तसेच असलेल्या रुग्णालयांचा विस्तार वा श्रेणीवर्धनाची मागणी सातत्याने केली जाते. मात्र यासाठी वित्त विभागाकडून निधी उपलब्ध होत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात रुग्णालयांची बांधकामे अर्धवट अवस्थेत आहेत. तसेच ज्या रुग्णालयांची बांधकामे पूर्ण झाली आहेत, ती उपकरणांअभावी सुरू करता येत नाहीत अशी स्थिती असल्याचेही आरोग्य विभागाच्या डॉक्टरांचे म्हणणे आहे.आरोग्य विभागाने २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात ६,०२३ कोटी रुपयांची मागणी केली होती, तर वित्त विभागाने ३,५०१ कोटी रुपये मंजूर करून प्रत्यक्षात केवळ २,८०१ कोटी रुपये दिले.

### आरोग्य विभागाला निधी मिळाला पाहिजे

याचाच अर्थ वित्त विभागाने आरोग्य विभागाच्या मागणीपैकी केवळ ५०.९९ टक्के निधी उपलब्ध करून दिला. याचा मोठा फटका आरोग्य विभागाच्या अनेक योजनांना तर बसलाच, शिवाय दैनंदिन देणीही भागवता आली नाहीत. परिणामी, रुग्णांना देण्यात येणारा आहार, वाहनचालकांचे तसेच सुरक्षा रक्षकांचे पगारही अनेक महिने थकल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याची दखल घेऊन आरोग्य विभागाला भरीव निधी मिळाला पाहिजे.

# ममतांचा 'एकला चलो रे'चा नारा

## » एकटी भाजपला पराभूत करू शकते : ममता बॅनर्जी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर इंडिया आघाडीलामोठा धक्का बसला आहे. इंडिया आघाडीतून तृणमूल काँग्रेसच्या कर्त्याधर्त्या आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी बाहेर पडल्या आहेत. तर, पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढवणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं आहे. मी एकटी भाजपला पराभूत करु शकते, असं म्हणत ममता बॅनर्जींनी भाजप विरोधात 'एकला चलो रे'ची भूमिका स्विकारली आहे. काँग्रेसला बळ देण्यासाठी राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या 'भारत जोडो न्याय यात्रे'चा परिणाम बंगालमध्ये उलट दिसून आला आहे. काँग्रेसला बळ मिळण्याऐवजी ममता बॅनर्जींनी राहुल गांधींच्याच यात्रेचा हवाला देत स्वबळावर निवडणुका लढण्याची घोषणा केली आहे.



लोकसभा निवडणूक तोंडावर आली, पण इंडिया आघाडीतील बिघाडी काही संपण्याचं नाव घेईना. अशातच इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांना मोठा धक्का देत, आगामी निवडणूक एकट्यानं लढवण्याची घोषणा ममता बॅनर्जींनी केली आहे. ममता बॅनर्जींनी तडकाफडकी एवढा मोठा निर्णय घेण्याचं कारण राहुल गांधींची भारज जोडो न्याय यात्रा असल्याच्या चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहेत. यामागील कारण म्हणजे, ममता बॅनर्जींनी भारत जोडो न्याय यात्रेबाबत केलेलं वक्तव्य. काँग्रेसची भारत जोडो न्याय यात्रा बंगालमधून जाणार आहे, मात्र आम्हाला याबाबत काहीच माहिती देण्यात आलेली नसल्याची खंत ममता बॅनर्जी यांनी बोलताना व्यक्त केली. ममता दिदिंच्या याच वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना मोठं उधाण आलं आहे. ममता बॅनर्जी आणि काँग्रेसमधील कुरबुरी नव्या नाहीत. काँग्रेसचे विरोधी पक्ष नेते अधीर रंजन चौधरी यांनी आजवर अनेकदा ममता बॅनर्जींच्या विरोधात दंड थोपटले आहेत. पश्चिम बंगालमध्ये ईडी अधिकाऱ्यांवर हल्ला झाला होता. याबाबत बोलताना काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांनी आज हल्ला झाला उद्या एखाद्या अधिकाऱ्याचा खूनही होऊ शकतो, असं म्हणत ममता बॅनर्जींवर शाब्दिक निशाणा साधला होता. एवढंच नाहीतर ममता बॅनर्जी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दलाल आहेत, असाही आरोप काँग्रेसनं यापूर्वी केला आहे. ममता बॅनर्जींनी पश्चिम बंगालमध्ये एकट्यानं लढायचा निर्णय घेतला आणि इंडिया आघाडीच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं. ममता बॅनर्जींनी इंडीया आघाडीला डावे नियंत्रित करतात, असा खळबळजनक आरोप केला. आपण इंडीया हे नाव सुचवलं पण आता डाव्यांच्या हातात इंडिया आघाडी गेली आहे, असंही ममता बॅनर्जी म्हणाल्या आहेत. ज्यांच्याविरोधात 34 वर्ष लढा दिला, त्या डाव्यांसोबत आम्ही राहू शकत नाही, असं ममता बॅनर्जींनी म्हटल होतं. त्यावर काँग्रेसनं ममता बॅनर्जींना संधीसाधू म्हणत पलटवार केला. फक्त एवढीच कारणं नाहीत, तर ममता बॅनर्जी आणि काँग्रेसच्या काडीमोडात शेवटची काडी ठरली ती म्हणजे, राहुल गांधींच्या 'भारत जोडो न्याय यात्रे'चा बंगालमधील प्रवेश. ममता बॅनर्जींनी आता थेट स्वबळावर लढण्याचा इशारा दिला आहे. त्यावर भाजपनं राहुल गांधींना भारत जोडो सोडा, इंडीया आघाडी जोडो यात्रा काढा, असा खोचक सल्ला दिला आहे. त्यामुळे एकंदरीत ममता बॅनर्जींची सोडचिठ्ठी इंडीया आघाडीला चांगलीच महागात पडू शकते, हे मात्र नक्की. दरम्यान, भाजपनं 2019 साली जिंकलेल्या 303 लोकसभेच्या जागांमध्ये पश्चिम बंगालचा वाटा 18 खासदारांचा होता. जर ममता, डावे आणि काँग्रेस एकत्र लढले असते, तर कदाचित 50 टक्क्यांचा व्होट शेअर मिळवून भाजपचं मोठं नुकसान इंडीया आघाडीला करता आलं असतं, पण आता ममता बॅनर्जींनी स्वबळावर लढण्याचा नारा दिला आहे. त्यामुळे बंगालमध्ये 2019 सारखंच यश भाजपला मिळू शकेल, हा अंदाज नाकारता येत नाही.

### विरोधकांचे कितपत ऐक्य

» इंडिया आघाडीची स्थापना झाली तेव्हाच विरोधकांचे कितपत ऐक्य होईल याबाबत साशंकता व्यक्त केली जात होती. पाटणा, बंगळुरू, मुंबईतील बैठकांमध्ये भाजपच्या विरोधात लढण्यासाठी सहमती घडवून आणण्यात आली. सप्टेंबरच्या सुरुवातीला मुंबईत झालेल्या बैठकीत जागावाटपाची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याचा निर्णय झाला होता. इंडिया आघाडीच्या मुंबईतील बैठकीतच शक्य असेल तेथेच एकत्र निवडणूक लढण्याचा ठराव करण्यात आला होता. 'शक्य असेल' हा शब्दप्रयोग करण्यात आल्याने भाजपच्या विरोधात देशभर एकास एक उमेदवार उभा करण्याची शक्यता मावळली होती.

# मुलींचे खुले केस हे सैतानाच्या हातातील दोरी

## » बदरुद्दीन अजमल यांचं वादग्रस्त वक्तव्य

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

मुस्लिम समाजातील महिला ही कुठल्याही मोठ्या पदावर असो. डॉक्टर, आयएएस असो किंवा आयपीएस असो त्यांना स्वतःचे केस झाकता येत नसतील किंवा त्यांनी हिजाब घातला नाही तर त्यांना मुस्लिम कसं समजलं जाईल? असं म्हणत मुस्लिम महिलांविषयीचे प्रमुख बदरुद्दीन अजमल यांनी वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. हा आसाममधला एक राजकीय पक्ष आहे. ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रेटिक फ्रंट असं या पक्षाचं नाव आहे. करीमगंज या ठिकाणी बदरुद्दीन यांची सभा होती तेव्हा त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.



"बाहेरच्या भागांमध्ये मी पाहिलं आहे, मुली जेव्हा शिक्षणासाठी जातात तेव्हा त्यांच्या डोक्यावर हिजाब असतो. त्यांचं डोकं आणि नजर खाली असतं. आसामधल्या मुस्लिम मुलींनीही हिजाब घालणं, त्यातच वावरणं आवश्यक आहे. हिजाब घालणं, डोक्यावर असलेले केस झाकणं ही प्रथा आपल्या धर्मात आहे." असंही अजमल यांनी म्हटलं आहे.मुलींचे, महिलांचे केस खुले असणं हे सैतानाच्या हातातल्या दोरीसारखं आहे. मुलींनी किंवा महिलांनी मेक अप करणं हे सैतानासाठी नुस्खा ठरतं. त्यामुळे बाजारात जात असाल, समाजात वावरत असाल तर तुम्ही हिजाब वापरलाच पाहिजे. तसंच मुलींची किंवा महिलांची नजर झुकलेलीच पाहिजे. विज्ञान शिका, डॉक्टर व्हा, आयएएस व्हा, आयपीस व्हा. पण मुस्लिम धर्मात जे सांगितलं आहे त्या हिजाबचा वापर सोडू नका. तुम्ही हिजाब वापरणं सोडलंत तर कळणार कसं तुम्ही मुस्लिम आहात? असाही प्रश्न बदरुद्दीन अजमल यांनी विचारला. मागच्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात त्यांनी मुस्लिम तरुणांबाबतही एक वक्तव्य केलं होतं. चोरी, लूटमार, बलात्कार, दरोडा अशा अपराधांमध्ये मुस्लिम क्रमांक एकवर आहेत असं ते म्हणाले होते त्यावरुनही वाद झाला होता. आता पुन्हा एकदा त्यांनी मुस्लिम महिलांबाबत वक्तव्य केलं आहे."बाहेरच्या भागांमध्ये मी पाहिलं आहे, मुली जेव्हा शिक्षणासाठी जातात तेव्हा त्यांच्या डोक्यावर हिजाब असतो. त्यांचं डोकं आणि नजर खाली असतं. आसामधल्या मुस्लिम मुलींनीही हिजाब घालणं, त्यातच वावरणं आवश्यक आहे. हिजाब घालणं, डोक्यावर असलेले केस झाकणं ही प्रथा आपल्या धर्मात आहे."

# अदाणींविरोधातील खटला सुनावणीस घेण्यास नकार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

राजस्थानमधील एका प्रकरणात अदाणी पॉवर्स लिमिटेडविरोधात खटला सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी घ्यायला रजिस्ट्रारनंच परस्पर नकार दिल्याचा प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात याचिकाकर्त्यानं सर्वोच्च न्यायालयातील संबंधित खंडपीठासमोर दाद मागितल्यानंतर न्यायालयानं रजिस्ट्रार विभागाला या प्रकरणावरून फटकारलं आहे. हा प्रकार लक्षात आल्यानंतर न्यायालयानंच या खटल्याच्या सुनावणीसाठी २५ जानेवारी तारीख दिली आहे. न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस व न्यायमूर्ती पी. व्ही. संजय कुमार यांच्या खंडपीठानं हे आदेश दिले. बार अँड बेंचनं यासंदर्भात सविस्तर वृत्त दिलं आहे.जयपूर विद्युत वितरण निगम लिमिटेडतर्फे सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील दुष्यंत दवे यांनी याचिका दाखल केली आहे. कोणत्याही याचिकेवरील सुनावणीसाठी ती न्यायालयाच्या त्या त्या दिवशीच्या कामकाजाच्या यादीत समाविष्ट करावी लागते. मात्र, अदाणींविरोधातील ही याचिका मात्र सर्वोच्च न्यायालयाने तारीख देऊनही त्या दिवशी यादीत समाविष्ट करण्यात आली नाही. रजिस्ट्रारनं परस्पर याचिका यादीत समाविष्ट न करण्याचे आदेश दिल्याचं याचिकाकर्त्यांच्या वकिलांना कळवलं. शेवटी दवे यांनी खंडपीठासमोर आपली तक्रार मांडल्यानंतर यावर कार्यवाही झाली.२०२०मध्ये अदाणींविरोधात सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान जयपूर विद्युत वितरण निगम लिमिटेडनं आक्षेप नोंदवला होता. अदाणी पॉवर्सकडून आकारण्यात येणारा लेट पेमेंट सरचार्ज बेकायदा असून कंपनीला असा अधिभार वसूल करण्याचा कोणताही अधिकार नाही.

# मी एक दिवसासाठी प्रंतप्रधान झालो तर

बॉलीवूडमधील बहुआयामी अभिनेते म्हणून पंकज त्रिपाठींना ओळखले जाते. आपल्या अभिनयाच्या जोरावर पंकज त्रिपाठी यांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. आजपर्यंत पंकज त्रिपाठी यांनी निरनिराळ्या भूमिका साकारल्या आहेत. नुकताच त्यांचा 'मैं अटल हूं' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटात त्यांनी भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांची भूमिका साकारली आहे. नुकतीच पंकज त्रिपाठींनी 'पिंकविला'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी त्यांच्या अभिनयाबरोबर वैयक्तिक आयुष्याबाबतही अनेक खुलासे केले आहेत. या मुलाखतीत त्यांना 'तुम्ही एक दिवसासाठी पंतप्रधान बनलात, तर काय कराल', असा प्रश्न विचारण्यात आला या प्रश्नाला पंकज त्रिपाठींनी गंमतीशीर उत्तर दिले आहे. ते म्हणाले, "मी पंतप्रधान बनलो आहे यावर विश्वास ठेवण्यातच माझा संपूर्ण दिवस निघून जाईल अन् तेव्हा लक्षात येईल की आपल्याकडची वेळ संपली आहे."दरम्यान, या मुलाखतीत पंकज त्रिपाठींनी बॉलीवूडमधील नेपोटिजम (घराणेशाही)वर भाष्य केले. ते म्हणाले, "जगातील प्रत्येक क्षेत्रामध्ये नेपोटिजम आहे; पण प्रत्येक क्षेत्रामधील नेपोटिजम उजेडात येत नाही. पण, प्रतिभा ही प्रतिभाच असते. त्यामुळे व्यक्तीच्या प्रतिभा व कौशल्याच्या आधारावर त्यांना संधी मिळायला हवी."दरम्यान, पंकज त्रिपाठींच्या कामाबद्दल बोलायचे झाले, तर काही महिन्यांपूर्वीच त्यांचा 'ओह माय गॉड २' व 'फुकरे ३' हे चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले होते. नुकतीच त्यांची 'कडक सिंह' ही वेब सीरिज OTT वर प्रदर्शित झाली आहे. १९ जानेवारीला त्यांचा 'मैं अटल हूं' चित्रपट प्रदर्शित झाला. मात्र, बॉक्स ऑफिसवर हा चित्रपट अपेक्षेपेक्षा कमी कमाई करताना दिसत आहे. पाच दिवसांमध्ये या चित्रपटाने केवळ ६.७८ कोटी रुपयांची कमाई केली आहे.बॉलीवूडमधील बहुआयामी अभिनेते म्हणून पंकज त्रिपाठींना ओळखले जाते. आपल्या अभिनयाच्या जोरावर पंकज त्रिपाठी यांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. आजपर्यंत पंकज त्रिपाठी यांनी निरनिराळ्या भूमिका साकारल्या आहेत.

# कंगना रिलेशनशिपमध्ये, स्वत:च दिली कबुली



कंगना रणौत व्यावसायिक निशांत पिट्टीला डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. कंगना व निशांतचे अयोध्येतील राम मंदिरातील काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते, त्यानंतर या चर्चा होऊ लागल्या. पण अभिनेत्रीने या अफवा असल्याचं स्पष्ट केलंय. तसेच ती कुणालातरी डेट करतेय, पण तो निशांत नाही असा खुलासा तिने केला. निशांत पिट्टीबरोबर कंगनाचं अफेअर असल्याचा दावा करणाऱ्या मीडिया रिपोर्टचा स्क्रीनशॉट शेअर करत कंगनाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर लिहिलं, "माझी मीडियाला नम्र विनंती आहे, कृपया चुकीची माहिती पसरवू नका. निशांतजी विवाहित आहेत आणि मी दुसऱ्या कोणाला तरी डेट करत आहे. योग्य वेळ आल्यावर मी त्याबद्दल सांगेन. एका महिलेने एखाद्या पुरुषाबरोबर फोटो काढल्याने रोज तिचं नाव एखाद्या नवीन पुरुषाशी जोडणं योग्य नाही."कंगनाचे निशांतबरोबरचे फोटो समोर आल्यानंतर त्यांनी राम मंदिराला एकत्र भेट दिल्याचं म्हटलं होतं. सोमवारी (२२ जानेवारी) उद्घाटनाच्या दिवशी दोघांनी मंदिराला भेट दिली आणि नंतर त्यांचे फोटो व्हायरल झाले होते. ते फोटो व्हायरल झाल्यानंतर दोघांबद्दल चर्चा सुरू झाल्या, पण या फक्त अफवा असल्याचं कंगनाने स्पष्ट केलं.निशांत पिट्टी 'इझी माय ट्रिप' या ऑनलाइन ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मचा सह-संस्थापक आहे. फॉर्च्यून इंडियाच्या अंडर ४० च्या यादीत त्याचे नाव होते. भारतातील सर्वात लोकप्रिय विमान प्रवास बुकिंग वेबसाइट तो चालवतो. तसेच तो 'मणिकर्णिका: द क्वीन ऑफ झांसी' या चित्रपटाचा सह-निर्माता होता.

# आर्यन खान विद्यार्थी म्हणून कसा होता?


आर्यन खान लवकरच दिग्दर्शक म्हणून सिनेविश्वात पदार्पण करणार आहे. यासाठी त्याची टीम एकत्र करत आहे. आर्यन खान विद्यार्थी म्हणून कसा होता? याबाबत युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्निया स्कूल ऑफ सिनेमॅटिक आर्ट्सच्या डीन आणि प्रोफेसर यांनी माहिती दिली आहे. न पदवीधर झाला आहे.एलिझाबेथ डेली या यूएससी स्कूल ऑफ सिनेमॅटिक आर्ट्सच्या डीन आहेत आणि डॉ. प्रिया जयकुमार, प्रोफेसर आणि सिनेमा अँड मीडिया स्टडीज विभागाच्या प्रमुख आहेत. या दोघींनी 'यूएससी इंडिया इनोव्हेशन समिट'मध्ये 'इंडियन एक्स्प्रेस'शी संवाद साधताना आर्यनबद्दलही सांगितलं. याठिकाणी यूएससीचे अध्यक्ष कॅरोल फोल्टदेखील हजर होते.आर्यन खान विद्यार्थी म्हणून कसा होता? याबाबत प्रिया जयकुमार म्हणाल्याआम्ही त्याला भेटू शकलो नाही कारण जवळपास दीड वर्षे करोना होता.

# भन्साळींच्या चित्रपटात आलिया

बॉलीवूडमधील आघाडीचे चित्रपट निर्माते व दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांनी नवीन चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटाचं नाव आणि स्टारकास्ट ठरली आहे. बॉलीवूडमध्ये सध्याच्या घडीचे लोकप्रिय तीन कलाकार या चित्रपटात एकत्र स्क्रीन शेअर करताना दिसतील. तरण आदर्श यांनी या चित्रपटाबद्दल माहिती शेअर केली आहे. संजय लीला भन्साळींच्या पुढच्या चित्रपटात रणबीर कपूर, आलिया भट्ट आणि विकी कौशल मुख्य भूमिका साकारतील. या चित्रपटाचे नाव 'लव्ह अँड वॉर' असे ठेवण्यात आले आहे. हा चित्रपट पुढच्या वर्षी ख्रिसमला म्हणजेच २०२५ मध्ये डिसेंबर महिन्यात प्रदर्शित होईल.या चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर चाहते आनंद व्यक्त करत आहेत. दरम्यान, रणबीर कपूर सध्या 'ॲनिमल' चित्रपटाच्या यशामुळे चर्चेत आहे. २०२३ सरताना त्याने बॉलीवूडला एक ब्लॉकबस्टर सिनेमा दिला. तर, विकी कौशलने 'सॅम बहादूर' सिनेमातून आपल्या अभिनयाची जादू दाखवली. या चित्रपटानेही बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली.



# माझा व काजोलचा किसिंग सीन मी पत्नी अन् मुलीबरोबर पाहिला



नेटफ्लिक्सवरील 'द आर्चीज'मध्ये खलनायकाच्या भूमिकेत झळकलेला ब्रिटीश-पाकिस्तानी अभिनेता अली खान याने काही महिन्यांपूर्वी डिझ्नी प्लस हॉटस्टारवरील मालिका 'द ट्रायल'मध्येही प्रमुख भूमिका साकारली होती. एका मुलाखतीत त्याने शोमधील त्याची सह-अभिनेत्री काजोलसोबतच्या किसिंग सीनबाबत भाष्य केलं. अलीने सांगितलं की त्याने आपल्या पत्नी आणि मुलीबरोबर हा सीन पाहिला होता.एका मुलाखतीत काजोलने या शोसाठी तिची 'नो-किसिंग पॉलिसी' मोडल्याबद्दल अलीला विचारण्यात आलं. तो म्हणाला, "तिची अशी पॉलिसी आहे, याची मला कल्पना नव्हती. याआधी मी काजोलला ओळखत नव्हतो. जेव्हा मी स्क्रिप्ट्स वाचल्या तेव्हाच मला त्यात एक किसिंग सीन असल्याचं समजलं." सेटवर हा किसिंग सीन म्हणजे काही फार मोठी गोष्ट नव्हती, असंही त्याने सांगितलं.अली पुढे म्हणाला, "विशेष म्हणजे मी माझ्या पत्नीला या सीनबाबत सांगितलं होतं. आम्ही थायलंडमध्ये सुट्टीवर होतो. आम्ही शो बघायला सुरुवात केली तेव्हा मी माझ्या पत्नीसोबत सोफ्यावर बसलो होतो आणि माझी मुलगी दुसऱ्या सोफ्यावर बसली होती. किसिंग सीन आला आणि गेला. त्यांनी माझ्याकडे पाहिलं आणि मी त्यांच्याकडे पाहिलं आणि आम्ही शो पाहत राहिलो इतकंच. हे माझे वडील आहेत किंवा हा माझा नवरा आहे, असा विचार कोणीही करत नव्हतं, कोणीही हसलं नाही. प्रेक्षक म्हणून त्यांनी शो पाहिला."दरम्यान, आधी दिलेल्या एका मुलाखतीत इंटिमेट सीन शूट करताना काजोलचा पती अजय देवगण सेटवर उपस्थित नव्हता, असं अलीने सांगितलं होतं. "शोमध्ये मी तिच्या प्रियकराची, तिच्या बॉसची भूमिका करतो, आमच्यात एक फ्रेंच किसचा सीन आहे. आम्ही कॉलेजमध्ये प्रेयसी-प्रियकर होतो. नंतर पुन्हा आमचा रोमान्स सुरू होतो, असा सीन आहे. आता हे आमचं काम असल्याने करावं लागतं. खरं तर सीन शूट करताना माझ्या तोंडात च्युइंग गम होती.

# कोहलीच्या जागी पाटीदारचा संघात समावेश

## भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेला सुरुवात

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेला गुरुवारपासून (25 जानेवारी) सुरुवात होत आहे. दोन्ही संघांमधील पहिला सामना हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणार आहे. स्टार फलंदाज विराट कोहली मालिकेतील पहिल्या दोन सामन्यात खेळणार नाही. वैयक्तिक कारणामुळे त्याने आपले नाव मागे घेतले आहे. त्यामुळे त्याच्या जागी मध्य प्रदेशचा फलंदाज रजत पाटीदारचा संघात समावेश करण्यात आल्याचे वृत्त आहे. बीसीसीआयने याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.**



हैदराबादमध्ये बीसीसीआयच्या वार्षिक पुरस्कार सोहळ्यादरम्यान रजत पाटीदार उपस्थित होता. तो टीम इंडियामध्ये सामील झाल्याची जोरदार चर्चा आहे. रजत हा रणजी करंडक विजेत्या संघाचा सदस्य आहे. तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करतो. नुकतेच त्याने अहमदाबाद येथे इंग्लंड लायन्स विरुद्ध भारत अ संघाकडून खेळताना पहिल्या अनौपचारिक कसोटीत 151 धावा फटकावल्या. यापूर्वी पाटीदारने इंग्लंड लायन्सविरुद्धच्या दोन दिवसीय सराव सामन्यात 111 धावा केल्या होत्या. 30 वर्षीय पाटीदारने देशांतर्गत क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी केली आहे आणि त्याची आकडेवारी जबरदस्त आहे.पाटीदारने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये 45.97 च्या सरासरीने 4000 धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने 12 शतके झळकावली आहेत. मध्य प्रदेशला रणजी चॅम्पियन बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. रजतने 2021-22 हंगामात नऊ डावांत 82.25 च्या सरासरीने 658 धावा केल्या. सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये तो दुसऱ्या क्रमांकावर होता. रजतने मुंबईविरुद्धच्या फायनलमध्ये मॅचविनिंग शतक झळकावले होते.2023 मध्ये टाचेच्या दुखापतीमुळे पाटीदार जवळपास नऊ महिने क्रिकेटपासून दूर होता. त्याच्या लंडनमध्ये शस्त्रक्रिया करावी लागली. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेत एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यानंतर त्याच्या कारकिर्दीचा आलेख आता खूप उंचावर पोहोचला आहे. 2000 सालापासून केवळ 6 भारतीय खेळाडूंनी वयाच्या 30 वर्षांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले आहे. रजत पाटीदारला गुरुवारी हैदराबादमध्ये इंग्लंडविरुद्ध कसोटी कॅप मिळाल्यास तो सूर्यकुमार यादवनंतरचा सातवा आणि केवळ दुसरा स्पेशालिस्ट फलंदाज ठरू शकतो. विराट कोहलीच्या जागी निवडलेल्या पाटीदारने मध्य प्रदेशसाठी त्याच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीत मुख्यतः तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर फलंदाजी केली आहे. त्याची लाल बॉल क्रिकेटमधील आकडेवारी प्रभावी आहे. त्याने 93 डावांमध्ये 45.97 च्या सरासरीने 4000 धावा केल्या आहेत, ज्यात 12 शतके आणि 22 अर्धशतकांचा समावेश आहे. आपल्या नऊ वर्षांच्या देशांतर्गत क्रिकेट कारकिर्दीत त्याने कठीण खेळपट्ट्यांवर धावा करणारा फलंदाज म्हणून छाप पाडली आहे.बीसीसीआयने आपल्या निवेदनात म्हटले की, ‘विराट कोहलीने वैयक्तिक कारण सांगून बीसीसीआयला इंग्लंडविरुद्धच्या आगामी कसोटी मालिकेतील पहिल्या दोन कसोटींमधून माघार घेण्याची विनंती केली आहे. या विषयी त्याने कर्णधार रोहित शर्मा, संघ व्यवस्थापन आणि निवडकर्त्यांशी चर्चा केली आहे. मीडिया आणि चाहत्यांनी विराटच्या गोपनीयतेचा आदर करावा आणि त्याच्या वैयक्तिक कारणांवरून अंदाज लावणे टाळावे. बोर्ड आणि संघ व्यवस्थापन विराटच्या पाठीशी असून आम्ही त्याच्या निर्णयाचा आदर करतो. दरम्यान, कसोटी मालिकेत प्रशंसनीय कामगिरी करण्यासाठी उर्वरित संघाच्या क्षमतेवर आम्हाला पूर्ण विश्वास आहे’, असे बोर्डाने स्पष्ट केले आहे.

हैदराबादमध्ये बीसीसीआयच्या वार्षिक पुरस्कार सोहळ्यादरम्यान रजत पाटीदार उपस्थित होता. तो टीम इंडियामध्ये सामील झाल्याची जोरदार चर्चा आहे. रजत हा रणजी करंडक विजेत्या संघाचा सदस्य आहे. तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करतो. नुकतेच त्याने अहमदाबाद येथे इंग्लंड लायन्स विरुद्ध भारत अ संघाकडून खेळताना पहिल्या अनौपचारिक कसोटीत 151 धावा फटकावल्या. यापूर्वी पाटीदारने इंग्लंड लायन्सविरुद्धच्या दोन दिवसीय सराव सामन्यात 111 धावा केल्या होत्या.

### पाटीदारने 12 शतके झळकावली

पाटीदारने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये 45.97 च्या सरासरीने 4000 धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने 12 शतके झळकावली आहेत. मध्य प्रदेशला रणजी चॅम्पियन बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. रजतने 2021-22 हंगामात नऊ डावांत 82.25 च्या सरासरीने 658 धावा केल्या. सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये तो दुसऱ्या क्रमांकावर होता. रजतने मुंबईविरुद्धच्या फायनलमध्ये मॅचविनिंग शतक झळकावले होते.2023 मध्ये टाचेच्या दुखापतीमुळे पाटीदार जवळपास नऊ महिने क्रिकेटपासून दूर होता. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यानंतर त्याच्या कारकिर्दीचा आलेख आता खूप उंचावर पोहोचला आहे.

# बोपण्णा दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वलस्थानी

## अव्वल स्थानी झेप घेणारा रोहन हा सर्वाधिक वयाचा टेनिसपटू

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**४३व्या वर्षी भारतीय टेनिसपटू रोहन बोपण्णाने शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. वर्षातल्या पहिलीवहिली ग्रँड स्लॅम स्पर्धा अर्थात ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत सेमी फायनलमध्ये वाटचालीसह रोहन बोपण्णा दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी विराजमान होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. ४३व्या वर्षी जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी झेप घेणारा रोहन हा सर्वाधिक वयाचा टेनिसपटू ठरणार आहे.**

याआधी हा विक्रम अमेरिकेच्या राजीव रामच्या नावावर होता. राजीवने ऑक्टोबर २०२२ रोजी ३८व्या वर्षी दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावलं होतं. दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावणारा रोहन हा केवळ चौथा भारतीय टेनिसपटू ठरणार आहे. याआधी लिअँडर पेस, महेश भूपती आणि सानिया मिर्झा यांनीच ही किमया केली आहे.ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत रोहन मार्क एब्डेन जोडीने अर्जेंटिनाच्या सहाव्या मानांकित मॅक्सिमो गोन्झालेझ आणि आंद्रेस मोल्टिनी जोडीवर ६-४, ७-६ (५) असा सरळ सेट्समध्ये विजय मिळवला. रोहन-मार्क जोडीसमोर आता टॉमस मचॅक आणि झिनझेन झांग या जोडीचं आव्हान असणार आहे.‘दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान



खूपच आनंददायी आणि समाधान देणारी गोष्ट आहे. मी स्वत: अजून ही गोष्ट मनाला पटवू शकलेलो नाही. गेले दीड वर्ष माझ्या कामगिरीत सातत्य राहिलं आहे. आज मी ज्या ठिकाणी पोहोचलो आहे तो प्रवास आणि हे स्थान याबद्दल प्रचंड अभिमानास्पद वाटते आहे. भारतीय टेनिसपटू क्रमवारीत अव्वल स्थानी हे भारतीय टेनिससाठी आवश्यक आहे. देशवासीयांनी दोन दशकांहून अधिक अशा कारकीर्दीत वेळोवेळी मला पुरेपूर प्रेम आणि पाठिंबा दिला आहे. त्यांच्या सदिच्छा माझ्यासाठी अतिशय मोलाचे आहेत. माझ्यामते क्रमवारीत अव्वल स्थान हे माझ्याकडून त्यांच्याप्रति ऋण व्यक्त करण्यासारखं आहे’, अशा शब्दात रोहनने आपल्या भावना व्यक्त केल्या. ‘तुझा प्रचंड अभिमान वाटतो, तुझ्याइतकं या स्थानाचा दुसरा कोणीच दावेदार असू शकत नाही’, अशा शब्दात सानिया मिर्झाने रोहनचं कौतुक केलं आहे. ‘जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान ही बिरुदावली तुला शोभून दिसते’, अशा शब्दांत सुमीत नागलने रोहनची प्रशंसा केली आहे. कारकीर्दीत रोहनच्या नावावर मिश्र दुहेरीचं एक जेतेपद आहे. २०१७ मध्ये फ्रेंच ओपन स्पर्धेत रोहनने कॅनडाच्या गॅब्रिएला डाब्रोव्हस्कीच्या बरोबरीने खेळताना जेतेपदावर नाव कोरलं होतं. पुरुष दुहेरीत, २०१० मध्ये अमेरिकन ओपन स्पर्धेत त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं. गेल्या वर्षी याच स्पर्धेत इब्डेनबरोबर खेळताना जेतेपदाने निसटती हुलकावणी दिली होती.४३व्या वर्षी रोहनने मास्टर्स १००० स्पर्धेचं जेतेपद पटकावण्याचा विक्रम केला होता. त्याने इब्डेनच्या बरोबरीने खेळताना जेतेपदाची कमाई केली होती.

### सरळ सेट्समध्ये विजय

हा विक्रम अमेरिकेच्या राजीव रामच्या नावावर होता. राजीवने ऑक्टोबर २०२२ रोजी ३८व्या वर्षी दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावलं होतं. रोहन मार्क एब्डेन जोडीने अर्जेंटिनाच्या सहाव्या मानांकित मॅक्सिमो गोन्झालेझ आणि आंद्रेस मोल्टिनी जोडीवर ६-४, ७-६ (५) असा सरळ सेट्समध्ये विजय मिळवला.